पुढारी

# ब्रेनडेड मुलाच्या अवयवांमुळे जीवदान

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

ब्रेन डेड झालेल्या २ वर्षे ९ महिने वयाच्या चिमुरड्याच्या कुटुंबाने आपले दु:ख बाजूला ठेवून त्याचे अवयवदान करीत इतर दोघांना नवे आयुष्य मिळवून दिले. या चिमुरड्याचे यकृत व कॉर्निया दान केले गेल्याने एकाला नवजीवन तर दुसऱ्याला दृष्टी मिळाली. लिलावती हॉस्पिटलमध्ये हे अवयवदान यशस्वीरित्या पार पडले.

'लीलावती'तील लेफ्टनंट जनरल डॉ व्ही. रविशंकर म्हणाले, बाळाचे अवयव रिट्राईव्हल शस्त्रक्रिया अत्यंत कौशल्याने आणि प्रसंगावधान राखत यशस्वीरित्या पार पाडण्यात आल्या. अवयव दान करून या मुलाला जिवंत ठेवण्याच्या त्याच्या पालकांच्या भूमिकेचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. या दोघांनी हा कठोर निर्णय घेऊन एक अनोखे उदाहरण स्थापित केले आहे.

My Mumbai Edition
Jul 21, 2023 Page No. 1
newspaper.pudhari.co.in